# उन्नती

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे माहितीपत्र

चौथी आवृत्ती- मार्च, 2025



## लॉईड्सच्या पुढाकाराने गडचिरोलीत पहिल्यांदा ‘भव्य क्रिकेट लीग’चे दिमाखदार आयोजन

गडचिरोलीतील क्रिकेटमधील प्रतिभेला स्थान मिळून देणारी लीग म्हणजे गडचिरोली डिस्ट्रीक्ट प्रीमियर लीग अर्थात ‘जीडीपीएल’. या क्रिकेट प्रीमियर लीगच्या निमित्याने गडचिरोलीतील क्रिकेटमधील गुणवत्ता जगासमोर आली आहे.

संबधित... 5



## नववर्षाची नवी सुरुवात - माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गडचिरोलीच्या परिवर्तनशील प्रकल्पांचे उद्घाटन

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 1 जानेवारी 2025 ला लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड च्या कोनसारी येथे विविध उपक्रमांचे लोकार्पण आणि भुमिपूजन संपन्न झाले.

संबधित... 2



## सामुदायिक कल्याणासाठी ‘मेगा आरोग्य शिबिर’

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या नेतृत्वाखाली लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलने 19-20 जानेवारी 2025 रोजी अलदंडी गावात मेगा आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. एलआईएफचे व्यवस्थापक बी. प्रभाकरन यांच्या नेतृत्वात या उपक्रमाअंतर्गत स्थानिक समुदायाला मोफत आरोग्य सेवा देण्यात आल्या.

संबधित... 6




## ऑस्ट्रेलियातल्या कर्टिन विद्यापीठात गडचिरोलीतील विद्यार्थ्यांची दुसरी तुकडी

गडचिरोलीतील विद्यार्थांना सक्षम बनविण्याच्या दृष्टीने लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे शैक्षणिक कार्य सुरु आहे. ऑस्ट्रेलियामध्ये सहा विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असलेल्या पहिल्या तुकडीच्या उल्लेखनीय यशानंतर, चार विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या तुकडीने आता ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठातल्या त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला सुरुवात केली आहे.

संबधित... 4

## ‘आरोग्ययोद्धा’ अश्विनी कावडूची कथा



अश्विनीने तिचा ए. एन. एम. जी. एन. एम. नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण केला. ती पूर्वी खासगी क्षेत्रात रु. 3000 पगारने काम करत होती, परंतु एल. एम. ई. एल. ने काम सुरू केल्यानंतर तिला नर्सिंग क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाची माहिती आणि अनुभव मिळाला. यामुळे रुग्णसेवेलाही तिला मदत झाली आणि त्याचबरोबर तिथे तिची आर्थिक उन्नती पण झाली.

संबधित... 7

## संदेश व्यवस्थापकीय संचालकांच्या डेस्कवरून...



**नमस्कार,**

गडचिरोलीला 'भारताचे आधुनिक पोलाद शहर' बनवण्याच्या प्रयत्नांमध्ये दिलेल्या अखंड पाठिंब्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते वर्षाच्या सुरुवातीला डी. आर. आय. प्रकल्प, एल. के. ए. एम. रुग्णालय, लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनी आणि कौशल्य विकास केंद्र यांचे उदघाटन झाले. आगामी पेलेट प्रकल्प, स्लरी पाइपलाइन आणि ग्राइंडिंग युनिटच्या माध्यमातून आर्थिक वाढीचा पाया रचला गेला. मेगा हेल्थ कॅम्प, जी. डी. पी. एल. आणि कर्टिन कार्यक्रमाची दुसरी तुकडी यासारखे समुदाय-आधारित उपक्रम सर्वसमावेशक विकासासाठी आमची वचनबद्धता आहे. कौशल्य विकास, युवा सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधांचा विस्तार आपल्या पुढील प्रवासाला चालना देणारा आहे. मी विश्वास देतो की गडचिरोली येत्या काही वर्षांत भारताचे आर्थिक शक्तीस्थान होण्यासाठी सज्ज राहिल.

**आपला,**
**बी. प्रभाकरन**
**व्यवस्थापकीय संचालक**
**लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड**

## संदेश संपादकाच्या डेस्कवरून...



**सर्वांना नमस्कार,**

उन्नतीच्या चौथ्या आवृत्तीमध्ये आपले स्वागत आहे. आपल्या सगळ्यांच्या खंबीर पाठिंबा आणि समर्पणामुळे हा प्रवास अविश्वसनीय ठरत आहे. 2025 च्या सुरुवातीपासून आपल्या सीएसआर उपक्रमांनी मोठी भरारी घेतली आहे, तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचत आहेत, त्यांना उपयुक्त ठरत आहे. लॉईड्स काली अम्मल मेमोरियल रुग्णालयाच्या जीवन बदलणाऱ्या आरोग्य सेवा, सूरजागढ, कोनसरी आणि घुग्गुसमधील महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्प किंवा समुदाय-चालित सामाजिक जागरूकता उपक्रम आणि सेवांच्या माध्यमातून आपले हे कार्य सुरु आहे. एल. के. ए. एम. रुग्णालयाचा 30 खाटांवरून 100 खाटांपर्यंत विस्तार, अलदंडी येथे मोफत मेगा आरोग्य शिबीर, कर्करोग रुग्णांसाठी उपचार आणि आजारी रुग्णांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करणे यासह आरोग्यसेवेप्रती आमची बांधिलकी पूर्वीपेक्षा अधिक मजबूत आहे. शिक्षणात, हेड्री येथील लॉईड्स राज विद्या निकेतन शाळेत सर्वांसाठी मोफत, दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्यात आले आहे. तेथील विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाच्या सुविधांचा विस्तार केला जाणार आहे. ही आवृत्ती या परिवर्तनात्मक प्रयत्नांवर आणि आपण एकत्रितपणे आणखी चांगल्या भविष्याची निर्मिती कशी करत आहोत हे अधोरेखित करणारी आहे.

**आपली**
**कीर्ती रेड्डी**
**संपादक, उन्नती**

CMYK

# विकासाची नवी भरारी - परिवर्तनशील प्रकल्पांचे भव्य अनावरण







**कोनसरी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते 1 जानेवारी 2025 ला कोनसरी येथे लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या विविध उपक्रमांचे लोकार्पण आणि भूमिपूजन संपन्न झाले. गडचिरोलीसाठी सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे एक धाडसी नवीन युग यानिमित्ताने सुरु झाले.

लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनी प्रकल्पामुळे कौशल्य प्रशिक्षणसह रोजगार मिळत आहे. तब्बल 600 स्थानिक महिलांना या प्रकल्पांनी सक्षम केले आहे.

**लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल :** रुग्णांच्या वाढत्या संख्येला लक्षात घेऊन रुग्णालयात 30 खाटांचा विस्तार 100 खाटांच्या मल्टी-स्पेशालिटी सेंटरमध्ये परिवर्तित करण्यात आला. त्यामुळे विविध आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांना अधिक प्रभावी,सुलभ उपचार अत्याधुनिक पद्धतीने घेता येत आहे..

**लॉईड्स राज विद्या निकेतनः** हेड्री येथील शैक्षणिक संस्थेत 400 विद्यार्थ्यांसाठी प्री-नर्सरी ते इयत्ता 5 पर्यंत मोफत दर्जेदार शिक्षण प्रदान करण्यात येत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी इयत्ता १२ वी पर्यंत विस्तार करून विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्याची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे.

**औद्योगिक उपक्रम केंद्रस्थानी**

- कोनसरी येथील डायरेक्ट रिड्यूस्ड आयर्न (डीआरआय) प्रकल्पातून 700 लोकांना रोजगार निर्माण होणार आहे.
- पेलेट प्रकल्प आणि स्लरी पाइपलाइनमुळे रोजगाराच्या 1000 संधी निर्माण होतील.
- हेड्री येथील लोहखनिज दळण युनिट 1500 लोकांसाठी रोजगार निर्माण करून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणार आहे.

स्थानिक नागरिक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी पोलीस निवासस्थान, व्यायामशाळा आणि बाल उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. एलएमईएलच्या 6,000 कामगारांना कर्मचारी समभाग मालकी योजना (ESOP) प्रदान करण्यात आले. ज्यामध्ये कामगार आणि ऑपरेटर श्रेणीतील 80% लाभार्थी आहेत. पुनर्वसनाचा मार्ग स्वीकारणाऱ्या आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना कंपनीचे समभाग प्रदान करण्यात आले आहेत.

पद्मश्री डॉ. तुलसी मुंडा यांना कंपनीच्या 10,000 समभागांनी सन्मानित करण्यात आले. तसेच गट्टा, गर्देवाडा, हालेवाडा, पिपलीबुर्गी, वांगेतुरी आणि अलदंडी या एओपी अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये 1400 हून अधिक स्थानिक युवकांसाठी लॉईड्स कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिक तरुणांना स्वावलंबी बनवण्याच्या आणि रोजगाराकरिता दगडी बांधकाम, बार बेंडिंग, शटरिंग, वेल्डिंग आणि सुतारकाम यासारख्या विविध संधी उपलब्ध केल्या.

गडचिरोलीला आधुनिक पोलाद शहर आणि प्रादेशिक विकासाचे केंद्र बनवण्याच्या एलएमईएल आणि एलआयएफच्या वचनबद्धतेला हे उपक्रम अधोरेखित करतात. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, समुदायांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि जिल्ह्याचे उज्ज्वल भविष्य सुनिश्चित करण्यासाठी हे उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत.

## बेलसानीत शुद्ध पाण्याचा नवा स्रोत, लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचा वॉटर एटीएम!

**बेलसानी :** लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड, घुग्गुस अंतर्गत लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने बेलसानी गावात रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) वॉटर फिल्टरेशन युनिटचे उद्घाटन करण्यात आले, जे त्यांच्या सीएसआर उपक्रमाचा भाग म्हणून 233 घरांना (976 रहिवाशांना) स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवेल.

अनेक वर्षांपासून गावकऱ्यांना अस्वच्छ जलस्रोतांचा सामना करावा लागत होता, ज्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत होत्या. नवीन जलशुद्धीकरण केंद्राचे उद्दिष्ट पाण्यामुळे होणारे रोग कमी करणे आणि एकूण आरोग्य सुधारणे हे आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन श्रीमती इंदिरा पोळ (सरपंचा, बेलसानी) कौशिक घोष (जी. एम. एच. आर) आणि तरुण केसवानी (वरिष्ठ व्यवस्थापक) यांनी केले. या जल शुद्धीकरण प्रकल्पाच्या



माध्यमातून सामुदायिक कल्याण आणि शाश्वततेसाठी फाउंडेशनची वचनबद्धता अधोरेखित होते.

हा उपक्रम ग्रामीण विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्यामुळे निरोगी आरोग्यासाठी स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध झाले.



## ज्ञानाच्या प्रकाशाने उजळणार भविष्य म्हातारदेवी अंगणवाडीचे नूतनीकरण

**नवे रूप, नव्या संधी**

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने सीएसआर उपक्रमांतर्गत बालपणातील शिक्षणाला चालना देण्यासाठी म्हातारदेवी येथे अंगणवाडीचे नूतनीकरण करण्यात आले. नूतनीकरणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांसाठी चैतन्यशील आणि साधनसंपन्न शिक्षण पर्यावरण निर्माण करणे.

अंगणवाडीचे उद्घाटन श्री. वाय. जी. एस. प्रसाद यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी घुग्गुसमधील लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे पदाधिकारी, सरपंचा श्रीमती संध्याताई पाटील आणि स्थानिक भागधारक उपस्थित होते. स्थानिकांनी देखील या प्रसंगी लक्षणीय सहभाग नोंदवला.

अंगणवाडीचे स्वरूप अधिक आकर्षक आणि मूलभूत सोई-सुविधा परिपूर्ण करण्याकरिता रंगीबेरंगी भित्तीचित्रे, आवश्यक फर्निचर, खेळणी, खेळाची उपकरणे आणि जेवणासाठी लागणाऱ्या थाळ्यांचे योगदान देण्यात आले.

हा उपक्रम केवळ भौतिक सुविधा पुरवणारा नसून, ग्रामीण शिक्षणाच्या दर्जात सुधारणा घडवून आणणारा आणि मुलांचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी सामुदायिक सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरणारा आहे.










# रोटरी उत्सवाने शिक्षणाला दिली नवी दिशा

**चंद्रपूर:** लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने 'रोटरी उत्सव' मध्ये आपल्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांचे प्रभावी सादरीकरण करत समाजसेवेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या विविध सामाजिक प्रकल्पांची माहिती देण्यात आली, तसेच जी. डी. गोएंका लॉईड्स पब्लिक स्कूलच्या प्रवेश प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

उत्सवात फाउंडेशनच्या स्टॉलला मोठा प्रतिसाद मिळाला. संस्थेच्या सामाजिक प्रकल्पांचे प्रदर्शन मांडण्यात आले, अभ्यागतांशी संवाद साधण्यात आला आणि फाउंडेशनच्या विविध कल्याणकारी उपक्रमांविषयी माहितीपत्रके वितरित करण्यात आली.

स्टॉलचे उद्घाटन युनिट हेड श्री. वाय. जी. एस. प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब चंद्रपूरचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. प्रशांत पुरी यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.

हा उत्सव सुमारे 1,00,000 उपस्थितांच्या सहभागामुळे अधिक प्रभावी ठरला. सामाजिक कल्याण, शिक्षण आणि



सामुदायिक विकास याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ ठरले.

या उपक्रमाच्या माध्यमातून लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने सामुदायिक विकास आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी असलेल्या आपल्या वचनबद्धतेला आणखी बळकटी दिली. समाजातील सकारात्मक बदलांसाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवले जातील, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला.

# 'रस्ते सुरक्षा मोहिम' अंतर्गत हेल्मेट वितरण आणि जनजागृती उपक्रम

**कोनसरी:** रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी कोनसरी प्रकल्प आणि सुरजागढ खाणीं जवळील गावांमध्ये रस्ते सुरक्षा मोहिमेअंतर्गत हेल्मेट वितरण आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. या मोहिमेचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित वाहतुकीचे महत्त्व पटवून देणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करणे हा आहे.

या अभियानांतर्गत कोनसरी येथे 533 हेल्मेटचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये आष्टी (76), येनापूर (49), कोनसरी (126), चित्तरंजनपूर (93), अड्याळ (38), चंदनखेडी (27), उमरी (30) आणि अंखोडा (75) या गावांचा समावेश होता. याशिवाय एटापल्ली भागात 321 आणि आलापल्ली भागात 462 हेल्मेट वाटप करण्यात आले.

याशिवाय, वाहतूक नियम आणि रस्ते सुरक्षेवरील माहितीपूर्ण व्हिडिओ प्रदर्शित करणाऱ्या एलईडी व्हॅनचे प्रदर्शन अनेक गावांमध्ये सलग 2 महिने करण्यात आले. तसेच पथनाट्यांद्वारे जनजागृती करण्यात आली, ज्यामध्ये हेल्मेट घालण्याचे महत्त्व आणि वाहतूक नियमांचे पालन करण्यावर भर दिला गेला. एकूण 1,316 लोकांनी या मोहिमेचा लाभ घेतला.

या उपक्रमाने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा जागरूकता वाढवली आणि अपघात टाळण्यासाठी हेल्मेटच्या महत्त्वावर भर दिला. सुरक्षित वाहतुकीसाठी भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.








महिला सशक्तीकरण

# कुक्कुटपालन- विकासाची नवी दिशा

**पेठा:** शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कुक्कुटपालन वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाद्वारे स्थानिक महिलांना आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळाली आणि त्यांना आर्थिक मदतही झाली.

कार्यक्रमात श्रीमती वनिता कोरामी (सरपंचा, तोडासा जी. पी.) आणि अन्य स्थनिक नेते उपस्थित होते. अनुभवी कुक्कुट विक्रेता श्री. अक्षय यांनी सहभागींना स्वच्छता, लसीकरण आणि कुक्कुटपालनाच्या सर्वोत्तम पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. महिलांना त्यांचे उपक्रम सुरू करण्यासाठी तीन महिन्यांच्या खाद्य पुरवठ्यासह पिल्ले वितरित करण्यात आली. पेठा, करमपल्ली आणि एकरा येथील ओरसी चमूंच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि प्रदेशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरेल.

उत्पन्न निर्मितीला चालना देण्यासाठी 'आयजीए' (उत्पन्न निर्मिती चमु)ग्रुपच्या माध्यमातून हा उपक्रम भविष्यात आणखी विस्तारला जाईल, असे आयोजकांनी सांगितले. स्थानिक महिलांनी या संधीचा लाभ घेत स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकावे, असे आवाहन करण्यात आले.








# 'ग्राम स्वच्छता अभियान' कोनसरीमध्ये समुदाय-चलित उपक्रम





**कोनसरी :** लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन तर्फे 'ग्राम स्वच्छता अभियान' राबविण्यात आले. स्थानिक स्वच्छता आणि पर्यावरणीय स्वच्छतेला चालना देण्यासाठी आयोजित या उपक्रमात ग्राम पंचायत कोनसरी आणि जिल्हा परिषद हायस्कूल कोनसरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

गावभर स्वच्छतेचा संदेश पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांची उत्साहात रॅली काढण्यात आली. या उपक्रमात सुमारे ५० विद्यार्थी, स्वच्छता कर्मचारी आणि स्थानिक रहिवासी सहभागी झाले.

सामुदायिक सहभागाच्या बळावर गावाची स्वच्छता आणि आरोग्य सुधारण्यासाठी हा महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरेल.

स्थानिक अधिकारी आणि शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीते पार पडला. एलआयएफ तर्फे स्वच्छतेविषयी जनजागृती वाढवण्याच्या वचनबद्धतेचा भाग म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला. गावकऱ्यांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हे उद्दिष्ट पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

CMYK

# डॉ. तुलसी मुंडा - एलआयएफसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ !

**हेड्री:** पद्मश्री पुरस्कार विजेत्या आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. तुलसी मुंडा यांनी एलआयएफ हेड्री परिसराला भेट दिली आणि कर्मचारी, विद्यार्थी आणि समुदाय सदस्यांना स्थानिक विकासासाठी प्रेरित केले.

त्यांच्या भेटी दरम्यान, डॉ. मुंडा यांनी शाळा, रुग्णालय आणि वस्त्रोद्योग विभागासह परिसराच्या विविध उपक्रमांचा दौरा केला. त्यांनी शिक्षक, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि कार्यकारी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, उपस्थित असलेल्या प्रत्येकाला त्यांनी आपल्या अनुभवरूपी शब्दांनी प्रोत्साहित केले. त्यांच्या भेटीने या प्रदेशातील शाश्वत वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी एलआयएफची वचनबद्धता अधोरेखित केली. सामाजिक कार्यातील त्यांच्या व्यापक अनुभवाने समृद्ध झालेल्या डॉ. मुंडा यांच्या प्रेरणादायी संवादाने समाजाच्या उन्नतीसाठी एकता आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व लक्षात आले.

डॉ. तुलसी मुंडा यांनी कॅम्पस समुदायाशी संवाद साधुन 'सामूहिक कृती, समर्पण आणि उद्देश' या त्रिसुत्री कायमस्वरूपी बदलाचा मार्ग मोकळा करू शकतात. हा संदेश यावेळी त्यांनी दिला.







# एक संभाषण ज्याने दिली प्रेरणा...



**बांडे :** लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रभाकरण यांनी बांडे या गावातील एक जिज्ञासु विद्यार्थी इग्नासियस प्रकाश बाडा याची भेट घेतली. इग्नासियस सध्या ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठात 'इनोवेशन अँड आंत्रप्रेनीयरशीप' विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत असून दोन महिन्यांच्या विश्रांतीसाठी भारतात परतला आहे.

या चर्चेदरम्यान, प्रभाकरण सरांनी इग्नासियसच्या समर्पणाची आणि शिक्षण व इनोवेशनबद्दलच्या जागतिक दृष्टिकोनाची प्रशंसा केली. कठोर परिश्रम आणि दृढनिश्चयामुळे परदेशात आणि देशात संधी मिळू शकतात, यावर त्यांनी भर दिला. तसेच, स्थानिक तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत बनण्याचे महत्त्व पटवून देत, शिक्षणानंतर भारताच्या विकासात योगदान देण्यासाठी परतण्याचा विचार करण्यास त्याला प्रवृत्त केले.

या संवादात केवळ शैक्षणिक यश नव्हे, तर पुढच्या पिढीला मार्गदर्शन व सक्षम करण्याच्या व्यापक दृष्टीकोनावरही लक्ष केंद्रित करावे, तसेच त्याचे परदेशातील शिक्षणाचे अनुभव सध्याच्या विद्यार्थ्यांसोबत शेअर करण्याचा सल्ला प्रभाकरण सरांनी त्यांला दिला. अशा अनुभवांमुळे इतर विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि त्यासाठी मेहनत करण्याची प्रेरणा मिळू शकते, असा त्यांचा विश्वास आहे.

हा संवाद केवळ एका विद्यार्थ्यासाठी नव्हे, तर संपूर्ण युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. शिक्षण, नवीनता आणि स्थानिकांच्या प्रगतीसाठी योगदान देण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

# लॉईड्स राज विद्या निकेतन शाळेत
## 76 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा




**हेड्री :** एलआयएफ कॉम्प्लेक्स, हेड्री येथील लॉईड्स राज विद्या निकेतन (एल. आर. व्ही. एन.) शाळेने ७६ वा प्रजासत्ताक दिवस उत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला. या गौरवशाली सोहळ्यात पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्यानंतर विविध सांस्कृतिक आणि क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी संचलनाद्वारे शिस्तबद्धतेचे दर्शन घडवत देशाबद्दलचा आदर व्यक्त केला. प्रजासत्ताक दिनाच्या उत्साहात भर घालत विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे विविध रंग उलगडणारी नेत्रदीपक नृत्य सादरीकरणे सादर केली. या सोहळ्याचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून आत्मविश्वासाने केलेले वक्तृत्व. पूर्वी मंचावर बोलण्यास संकोच करणारे विद्यार्थी आता मोठ्या गर्दीसमोर प्रभावी इंग्रजीत संवाद साधत आहेत, हा बदल लॉईड्स राज विद्या निकेतनच्या दर्जेदार शिक्षण आणि समर्पित मार्गदर्शनामुळे घडून आला.

या कार्यक्रमाला लॉईड्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड (एल. एम. ई. एल.) आणि लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (एल. आय. एफ.) च्या मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कष्ट, आत्मविश्वास आणि देशप्रेमाचे कौतुक केले. या सोहळ्याने तरुणांच्या मनात देशभक्तीचे मूल्य रुजविण्याचे मोलाचे कार्य केले.





ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठासाठी तिसऱ्या बॅचची परीक्षा

# ऑस्ट्रेलियातल्या कर्टिन विद्यापीठात गडचिरोलीतील विद्यार्थ्यांची दुसरी तुकडी

**गडचिरोली :** लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन (एलआयएफ) ने कर्टिन विद्यापीठाच्या पूर्ण प्रायोजित शैक्षणिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या तुकडीची अधिकृत घोषणा केली. या उपक्रमाअंतर्गत चार नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या उच्च शिक्षणाचा प्रवास सुरू केला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये वंशिका चालुरकर (गडचिरोली, खाण अभियांत्रिकी), संकेत धानोरकर (एटापल्ली, मेकाट्रॉनिक्स अभियांत्रिकी), शार्दुल जोगदंड (चामोर्शी, प्रकल्प व्यवस्थापन) आणि बोरेम्पेली रविंदर (सिरोंचा, खाण अभियांत्रिकी) यांचा समावेश आहे. त्यांनी आयईएलटीएस आणि व्हिसा प्रक्रियेत यश मिळवून ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठात प्रवेश निश्चित केला आहे.




कर्टिन विद्यापीठ ऑस्ट्रेलियात शिक्षण घेत असलेली एल.आय.एफ ची पहिली व दुसरी बॅच.

हा उपक्रम एलएमईएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरन यांच्या दूरदृष्टीतून साकारला असून, गडचिरोलीतील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबवला जात आहे. स्थानिक युवकांना सक्षम करण्यासोबतच स्थानिक विकासाला चालना देण्यासाठी एलआयएफ कटिबद्ध आहे.

या मोहिमेच्या पुढील टप्प्यात, तिसऱ्या तुकडीसाठी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया आधीच सुरू करण्यात आली आहे, जेणेकरून गडचिरोलीतील अधिकाधिक प्रतिभावान युवकांना जागतिक शिक्षणाच्या संधी मिळू शकतील.

# लॉईड्स राज विद्या निकेतनच्या विद्यार्थ्यांकडून हरित भविष्यासाठी वृक्षारोपण !





**हेड्री :** लॉईड्स राज विद्या निकेतनच्या विद्यार्थ्यांनी हेड्री तलाव परिसरात वृक्षारोपण मोहिमेत सक्रिय सहभाग घेत, पर्यावरण संवर्धनासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. हरित भविष्यास चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या मोहिमेत शालेय प्राध्यापक आणि स्थानिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या उपक्रमादरम्यान, विद्यार्थ्यांनी जैवविविधता जपण्याचे महत्त्व आणि हवामान बदलाच्या प्रभावांना तोंड देण्यासाठी वृक्षारोपणाची भूमिका याबाबत सखोल माहिती घेतली. त्यांना पर्यावरण व्यवस्थापन आणि हरित क्षेत्राच्या संवर्धनाचे फायदे याविषयी मार्गदर्शन देण्यात आले. हेड्री तलावाजवळील ही वृक्षारोपण मोहीम केवळ परिसराचे सौंदर्य वाढवणारी नव्हती, तर विद्यार्थ्यांच्या निसर्गसंवर्धनाच्या बांधिलकीलाही अधोरेखित करणारी ठरली. हा उपक्रम पुढील पिढ्यांसाठी एक सकारात्मक संदेश देवून पर्यावरणाचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी आहे आणि प्रत्येक कृती पृथ्वीच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते हे अधोरेखित करते.

CMYK


















# गडचिरोली डिस्ट्रीक्ट प्रीमियर लीग ग्रँड फिनाले खेळ, समुदाय आणि संस्कृतीचा भव्य उत्सव

**गडचिरोली :** गडचिरोलीने एक ऐतिहासिक संध्याकाळ अनुभवली, जिथे गडचिरोली डिस्ट्रीक्ट प्रीमियर लीग (GDPL) चा थरारक अंतिम सामना, मान्यवर पुरस्कार वितरण सोहळा आणि सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांच्या सादरीकरणाने संपूर्ण एमआयडीसी मैदान दुमदुमले. तब्बल २०,००० प्रेक्षकांच्या उपस्थितीत, या कार्यक्रमाने केवळ दर्जेदार क्रिकेटचे दर्शन घडवले नाही, तर स्थानिक खेळाडूंना प्रेरणा दिली, समाजातील ऐक्य बळकट केले आणि गडचिरोलीचे क्रीडा व मनोरंजन विश्वातील स्थान अधोरेखित केले.

## आरंभापासून ग्रँड फिनालेपर्यंतचा प्रवास

GDPL ही स्पर्धा लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (LMEL) यांच्यावतीने ५ फेब्रुवारीपासून सुरु झाली. भारताचे माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री यांच्या हस्ते भव्य उद्घाटन झाले. सहभागी संघांचा मार्चपास्ट व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उद्घाटन सोहळा सजला आणि स्पर्धेच्या रंगतदार प्रवासाची सुरुवात झाली. गेल्या अनेक आठवड्यांमध्ये, जिल्ह्याच्या १२ तालुक्यांतील संघ, तसेच पोलीस, वनविभाग, महसूल विभाग व LMEL यांचे संघ यांच्यात T20 सामने पार पडले. लीग व नॉकआउट फेऱ्यांमधून उत्कंठावर्धक अंतिम सामन्याकडे वाटचाल झाली.



## अंतिम सामना : प्रतिष्ठेची लढत

गडचिरोली हुरिकेन्स विरुद्ध गडचिरोली वॉरियर्स (पोलीस संघ) यांच्यात अंतिम सामना सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत झाला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले, मात्र गडचिरोली हुरिकेन्स यांनी विजय मिळवत GDPL चषकावर आपले नाव कोरले.

## पुरस्कार वितरण सोहळा : उत्कृष्टतेचा गौरव

सायंकाळी ७:३० ते ८:०० वाजेपर्यंत झालेल्या पुरस्कार सोहळ्यात, स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. यामुळे जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना मोठा प्रेरणास्त्रोत मिळाला.

## संगीतमय संध्याकाळ – सोनू निगम यांचा कार्यक्रम

सायंकाळी ८ वाजता प्रसिद्ध गायक सोनू निगम यांचे लाईव्ह सादरीकरण सुरू झाले. त्यांच्या सोज्वळ आणि हृदयस्पर्शी गाण्यांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. गडचिरोलीत एवढ्या मोठ्या प्रमाणात आयोजित झालेला हा पहिलाच संगीत कार्यक्रम होता.

# स्थानिक क्रीडापटू आणि समुदायावर सकारात्मक परिणाम

## स्थानिक खेळाडूंना व्यासपीठ

GDPL स्पर्धेमुळे जिल्ह्यातील युवा खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. याआधी ज्या खेळाडूंना व्यावसायिक स्पर्धा अनुभवण्याची संधी नव्हती, त्यांना स्वतःचे कौशल्य दाखवण्याची सुवर्णसंधी मिळाली. यामुळे प्रशिक्षण घेण्याची तयारी आणि क्रीडाक्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा वाढली आहे.

## समुदायातील ऐक्य वाढवले

हा कार्यक्रम सर्व समाजासाठी एक आनंदसोहळा ठरला. खेळप्रेमी, कुटुंबीय, स्थानिक लोक आणि अधिकाऱ्यांचा एकत्रित सहभाग समाजात एकोपा वाढवणारा ठरला. स्थानिक व्यवसायिकांनाही चांगला प्रतिसाद मिळाला, जे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारे ठरले.

## प्रशासन आणि जनतेत विश्वासाचे नाते

पोलीस, वन आणि महसूल विभागाच्या सहभागामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक मजबूत झाला. त्यांच्या सहभागामुळे युवा विकास आणि सामाजिक ऐक्यासाठी सरकारी विभागांची सकारात्मक भूमिका अधोरेखित झाली.

## गडचिरोलीच्या विकासासाठी नवे दालन उघडले

या भव्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे गडचिरोली आता क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे केंद्र बनत आहे. GDPL आणि सोनू निगम यांच्या कार्यक्रमाने जिल्ह्याची क्षमता सिद्ध केली आहे, ज्यामुळे भविष्यात अधिक अशा उपक्रमांचे आयोजन होण्याची शक्यता वाढली आहे.

## एक अविस्मरणीय उत्सव

कार्यक्रमाच्या यशाबद्दल लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक प्रभाकरन सर म्हणाले:

"ही स्पर्धा केवळ एक क्रीडा स्पर्धा नव्हती, तर गडचिरोलीच्या क्षमतेचे प्रतीक होते. खेळाप्रती जनतेचा उत्साह, समाजातील ऐक्य आणि दिलखेच करमणूक - या साऱ्यांनी या सोहळ्याला अविस्मरणीय बनवले. गडचिरोलीच्या क्रीडाविकासात सहभाग घेण्याचा आम्हाला अभिमान आहे."

क्रिकेटचा थरार, नवोदित प्रतिभेचा गौरव, ऐतिहासिक संगीतमय संध्या आणि समाजातील सशक्त ऐक्य - या साऱ्यामुळे GDPL चे ग्रँड फिनाले गडचिरोलीच्या इतिहासात एक सुवर्ण पर्व ठरले आहे.



















# मानव सेवेस समर्पित वर्ष

## हेड्रीतील लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलचा पहिला वर्धापन दिन !

हेड्री : लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलने अभिमानाने आपला पहिला वर्धापन दिन साजरा केला. दर्जेदार, सुलभ आणि मोफत वैद्यकीय सेवा देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या रुग्णालयाने केवळ एका वर्षात स्थानिक भागात लक्षणीय प्रभाव पाडला आहे.









### एका वर्षात साध्य झालेले टप्पे

| सेवा | आकडेवारी (फेब्रुवारी 2025 पर्यंत) |
|---|---|
| बाह्यरुग्ण सेवा : | 81,000 हून अधिक रुग्णांना विविध आरोग्य समस्यांवर मोफत वैद्यकीय सल्ला |
| इनपेशंट प्रवेश : | 1,700 हून अधिक रुग्णांना रुग्णालयात उपचार |
| क्रिटिकल केअर : | 175 हून अधिक गंभीर रुग्णांवर आय.सी.यू. मध्ये यशस्वीरित्या उपचार |
| प्रसूती सेवा : | उच्च जोखमीच्या गर्भधारणेसह 150 हून अधिक बाळांची सुरक्षित प्रसूती |
| शस्त्रक्रियेतील उत्कृष्टता : | 620 हून अधिक प्रमुख शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण |
| दंत सेवा : | 600 हून अधिक दंत प्रक्रिया पूर्ण |
| सामुदायिक सहाय्य : | चंद्रपूर आणि नागपूरमध्ये सुपर-स्पेशालिटी काळजीसह 10 उच्च दर्जाच्या गंभीर प्रकरणांना प्रायोजित केले. |

**या यशातून समाजाने रुग्णालयावर दाखवलेला विश्वास आणि तेथील डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची अतूट बांधिलकी प्रतिबिंबित होते.**

### भविष्यातील विस्तार योजना

- आरोग्यसेवा सुलभता वाढवण्याच्या दृष्टीकोनातून, रुग्णालयाची क्षमता 30 खाटांवरून 100 खाटांपर्यंत वाढवण्याचे, अधिक रुग्णांना सेवा देण्यासाठी आणि प्रगत उपचार देण्यासाठी त्याच्या सुविधा अधिक बळकट करण्याचे उद्दिष्ट आहे.
- लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल त्याच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश करत असताना, ते दर्जेदार आरोग्यसेवा लोकांच्या जवळ आणण्यासाठी आणि समाजासाठी आरोग्यदायी उद्याची उभारणी करण्यासाठी समर्पित आहे.



## मुंबईत अत्याधुनिक मूत्रपिंड केंद्रासाठी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचा महत्त्वपूर्ण पुढाकार!

**मुंबई :** ब्रीच कँडी हॉस्पिटलचे दिवंगत संस्थापक आर. एन. गुप्ता यांच्या स्मरणार्थ अत्याधुनिक मूत्रपिंड केंद्र उभारण्यासाठी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन सहकार्य करत आहे. हे केंद्र मूत्रपिंड विकारांसाठी प्रगत निदान आणि उपचार सेवा पुरवणार असून, रुग्णालयाच्या वैद्यकीय सुविधांना अधिक सक्षम आणि परिणामकारक बनवणार आहे.

या उपक्रमाद्वारे लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या सामाजिक जबाबदारीची पुनर्पुष्टी होत असून, यामुळे अनेक रुग्णांना आधुनिक आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा मिळणार आहे. आर. एन. गुप्ता यांच्या कार्याचा सन्मान करणारा हा प्रकल्प, मुंबईतील आरोग्य सेवांसाठी दिशादर्शक ठरणार आहे आणि भविष्यात अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांसाठी नवा मार्ग मोकळा करणार आहे.

## घुग्गुससाठी जीवनरेखा : लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनची ॲडवांस ॲम्बुलेंस सेवा



**घुग्गुस :** लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनने घुग्गुसमध्ये एक विशेष आपत्कालीन भ्रमण सेवा सुरू केली आहे. या सेवेमार्फत आतापर्यंत 25 गंभीर रुग्णांना तातडीच्या उपचारांसाठी सरकारी व खासगी रुग्णालयात पोहोचवण्यात आले आहे. दुर्गम भागातील वैद्यकीय सुविधांचा अभाव भरून काढण्यासाठी ही रुग्णवाहिका सेवा अपघात, गंभीर आजार आणि प्रसूतीच्या गुंतागुंतींसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. हा उपक्रम त्वरित आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या फाउंडेशनच्या वचनबद्धतेचा भाग असून, सामुदायिक कल्याण आणि आपत्कालीन आरोग्य सुविधांचा विस्तार हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## सामुदायिक कल्याणासाठी 'मेगा आरोग्य शिबिर'



**गडचिरोली :** 19-20 जानेवारी 2025- लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या नेतृत्वाखाली लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलने आलदांडी गावात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले. श्री. बी. प्रभाकरन यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या उपक्रमाने 2,865 रुग्णांना मोफत आरोग्य सेवा प्रदान केल्या.

### विविध आरोग्य विभागांतील रुग्णांचा सहभाग:

**या शिबिरात विविध आजारांवर उपचार मिळाले, त्यात प्रमुख विभागांतील सहभागी रुग्णसंख्या खालीलप्रमाणे होती:**

- **सामान्य औषधोपचार:** 697 रुग्ण (7 संदर्भांसह)
- **अस्थिरोग (ऑर्थोपेडिक्स):** 433 रुग्ण (30 संदर्भ)
- **बालरोग:** 139 रुग्ण (10 संदर्भ)
- **प्रसूती व स्त्रीरोग:** 119 रुग्ण (10 संदर्भ)
- **सामान्य शस्त्रक्रिया:** 105 रुग्ण (38 संदर्भ)
- **त्वचारोग:** 228 रुग्ण (4 संदर्भ)

### नेत्ररोग: 1,382 रुग्ण, यामध्ये-

- मोतीबिंदूच्या उपचारासाठी 65 संदर्भ
- वाचन चष्म्यासाठी 721 रुग्ण
- फ्रेमसह चष्म्यासाठी 594 रुग्ण

### अतिरिक्त वैद्यकीय सेवा:

- **दंतवैद्यकीय सल्लामसलत:** 72 रुग्ण
- **ई. एन. टी. (कान, नाक, घसा) उपचार:** 107 रुग्ण (17 संदर्भ)
- **एम.बी.बी.एस. सल्लामसलत:** 316 रुग्ण (3 संदर्भ)
- **फिजिओथेरपी:** 75 रुग्ण
- **बहु-विशेषज्ञ सल्लामसलत:** 808 रुग्ण
- 10 हून अधिक ऑन-साइट निदान सेवा

### शिबिराची अंमलबजावणी आणि व्यवस्थापन:

- 30 डॉक्टर आणि 65 हून अधिक निमवैद्यकीय कर्मचारी यांनी संपूर्ण कार्यक्रमा दरम्यान सेवा दिली.
- मोतीबिंदू निदान, उपचार संदर्भ आणि चष्मा वितरणासाठी विशेष नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.
- मोफत वाहतूक आणि भोजन व्यवस्था, यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

### समुदायासाठी महत्वाचा उपक्रम:

- हा उपक्रम रुग्णालयातील डॉक्टर, बाह्य विशेषज्ञ, निमवैद्यकीय कर्मचारी आणि विविध विभागांतील सहाय्यक कर्मचारी यांचा समन्वयाने यशस्वीपणे पार पडला.
- हे मेगा आरोग्य शिबिर सामुदायिक सेवा आणि आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्टतेबद्दल रुग्णालयाची बांधिलकी अधोरेखित करते. भविष्यातही असेच उपक्रम राबवले जातील, याचा पुनरुच्चार या यशस्वी आयोजनाने केला आहे.

CMYK

# स्थानिक महिलांच्या कथा

## ‘स्वप्न साकारतेय...’

काजल – सहाय्यक परिचारिका, एल. के. ए. एम. रुग्णालय, हेड्री
मुळ गाव – मल्लमपहाडी.



‘माझे कुटुंब माझ्या कामाला आणि या नोकरीला पाठिंबा देत आहे. त्याचबरोबर, मीही माझ्या कुटुंबाला आर्थिक आधार देऊ शकते. या संधीमुळे माझी स्वप्ने पूर्ण होत आहेत, आणि मला आयुष्यात स्थिरता मिळाली आहे.’

## ‘शिक्षणाने बदलले आयुष्य’



शीतल गावडे – शिक्षक परिक्षक, एल. आर. व्ही. एन. शाळा, हेड्री
मुळ गाव – पांडेवाही.

या नोकरीच्या माध्यमातून मी माझ्या 2 मुलांची चांगली काळजी घेण्यास सक्षम आहे. ती म्हणते, “माझे पूर्वीचे आयुष्य कठीण होते आणि मी शेतांमध्ये काम करून उदरनिर्वाह करायची. मी शाळेत नोकरी करत असल्यापासून माझ्या जीवनात मोठा बदल झाला आहे. पुढे जाऊन, मला खात्री आहे की माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी आणखी चांगले दिवस येणार आहेत”.

## स्वावलंबनाची नवी दिशा

अनिता – सुरक्षा विभाग, एल. आय. एफ. संकुल, हेड्री.
मुळ गाव – आलेंगा



‘मी 10 वी पर्यंत शिकले आहे आणि पूर्वी मी शेतांमध्ये, महुआच्या फुलांच्या संकलनाचे काम करायची. जेव्हा एल. एम. ई. एल. ने त्याचे काम सुरू केले, तेव्हा मला सुरक्षा प्रभारी म्हणून प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली आणि हेड्री येथे नियुक्ती होण्यापूर्वी मला 1 महिन्याचे प्रशिक्षण मिळाले. मला हे सांगताना अभिमान वाटतो की बाहेर नोकरीसाठी जाणारी मी माझ्या कुटुंबातील पहिली मुलगी आहे आणि हळूहळू माझी कौटुंबिक स्थितीही सुधारत आहे’.

## स्वयंपूर्णतेचा आत्मविश्वास



जया इमला – गृहनिर्माण विभाग, सीएसआर कार्यालय
मुळ गाव – तुमारगुंडा

‘मी माझा अर्ज भरला होता आणि लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन, हेड्री येथे सादर केला होता. सुरुवातीला मी रोजंदारीवर काम करायची. माझ्या कुटुंबातील कोणीही माझी काळजी घेतली नाही, पण जेव्हापासून मी काम करायला सुरुवात केली, तेव्हापासून मी कमाई करू लागले आहे आणि स्वयंपूर्ण झाले आहे. यामुळे मला खरोखरच मदत झाली आहे आणि आता मला कोणावरही अवलंबून न राहता आवश्यक गोष्टी खरेदी करायच्या आहेत’.

## स्वप्नांपलीकडे उड्डाण

सावित्री हेडू – एल. एम. व्ही. चालक, हेड्री

‘माझे 10 वे वर्ग पूर्ण केल्यानंतर, मी घरी फक्त शेतांमध्ये काम करत होतो आणि त्याव्यतिरिक्त, मी तेंदूची पाने आणि महुआच्या पानांचे संकलन करत होतो. एल. एम. ई. एल. ने त्याचे काम सुरू केल्यानंतर, मी सुरुवातीला हाऊसकीपिंग विभागात होतो, त्यानंतर मला छिंदवाडा येथे 2 महिने एल. एम. व्ही. प्रशिक्षणाची संधी मिळाली. त्यानंतर मला एल. एम. ई. एल. च्या संकेतस्थळावर 4 महिन्यांचे नोकरीचे प्रशिक्षण मिळाले. मी कधीही विचार केला नव्हता की मी एल. एम. व्ही. चालवीन, परंतु लॉईड्स मेटल्सने दिलेल्या संधीमुळे आता मी आत्मविश्वासाने एल. एम. व्ही. चालवू शकतो’.



# महिलांमध्ये कर्करोग जागरूकता शिबीर



**कोनसरी :** जिल्हा परिषद शाळेच्या सभागृहात ब्रेस्ट, ओरल आणि सर्वायकल कॅन्सर जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला 60 हून अधिक महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कर्करोगाचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचारांबाबत महिलांना जागरूक करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## विशेष मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी

- कर्करोग समुपदेशक श्री. रवी वासेकर यांनी संवादात्मक सत्राद्वारे कर्करोगाची सामान्य लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्य संवर्धनाच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.
- कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून श्रीमती रीना रॉय (एल. सी. डी. तंत्रज्ञ, आर. एच. चामोर्शी) तसेच परिचारिका श्रीमती अलका मामूलवार आणि श्रीमती सुकेशानी आत्राम यांनी उपस्थित राहून महिलांना प्रोत्साहन दिले.

## महिलांसाठी प्राथमिक आरोग्य तपासणी

- गाठी, तोंडातील व्रण आणि मासिक पाळीतील अनियमितता यांसारख्या समस्यांचा सामना करणाऱ्या महिलांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. गरजेनुसार त्यांना पुढील उपचारांसाठी योग्य मार्गदर्शनही देण्यात आले.

## आरोग्य जागरूकतेचा सकारात्मक संदेश

- या शिबिरामुळे महिलांना लवकर निदानाचे महत्त्व पटले आणि आरोग्य तपासणीबाबत जागरूकता वाढली. महिलांनी स्वत:च्या आरोग्याची जबाबदारी घ्यावी आणि वेळेवर वैद्यकीय मदत घ्यावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



# लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या सॅनिटरी नॅपकिन कार्यशाळांद्वारे महिलांचे सशक्तीकरण

**घुग्गुस:** लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत 10 गावांमध्ये सॅनिटरी नॅपकिन कार्यशाळांचे आयोजन केले. या उपक्रमाने केवळ मासिक पाळी स्वच्छतेविषयी जागरूकता वाढवली नाही, तर महिलांना स्वयंरोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाची संधीही उपलब्ध करून दिली.

**आरोग्य आणि उद्योजकतेचा संगम**

या कार्यशाळांमध्ये महिलांना सॅनिटरी नॅपकिन तयार करणे, वितरित करणे आणि विक्रीचे कौशल्य शिकवले गेले, ज्यामुळे त्यांना आपल्या स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली. यामुळे मासिक पाळीच्या दरम्यान योग्य स्वच्छता राखण्यास मदत झाली, तसेच महिला उद्योजकतेला चालना मिळाली.

**महिलांच्या सशक्तीकरणासाठी पुढाकार**


या उपक्रमाने महिलांना केवळ आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीने सशक्त केले नाही, तर त्यांना आर्थिकदृष्ट्याही स्वयंपूर्ण होण्याची प्रेरणा दिली. कार्यशाळेतील सहभागींनी नवीन व्यावसायिक संधी शोधण्याची आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची दिशा मिळवली.

**ग्रामीण महिलांसाठी सकारात्मक बदल**

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या या पुढाकारामुळे ग्रामीण महिलांना आरोग्य, प्रतिष्ठा आणि आर्थिक स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळाला आहे. समाजात आरोग्यदायी आणि सक्षम भविष्यासाठी फाउंडेशनच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे आणखी एक पाऊल ठरले आहे.








**आडवे शब्द**

१. गोदावरी व इंद्रावती नद्यांचा संगम असलेले ठिकाण
३.चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांची सीमा असलेली नदी
४.आमटेंचा लोक बिरादरी प्रकल्प असलेला तालुका
७.गडचिरोली जिल्ह्याचा सर्वात उत्तरेला असलेला तालुका
८.गडचिरोली जिल्ह्याची राज्य भाषा
९.गडचिरोली जिल्ह्यातील लोह कारखाना असलेले ठिकाण

**उभे शब्द**

२.गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होणारा माशांपासून मिळणारा द्रव
३.गडचिरोली जिल्ह्यात असलेला गोंड कालीन किल्ला
५.गडचिरोली जिल्हा कोणत्या राज्यात आहे
६.गडचिरोली तालुक्याच्या उत्तरेस आणि वडसा व कुरखेडा तालुक्याच्या दक्षिणेस असलेला तालुका.

**सोडवलेले कोडे जवळच्या ग्राम संपर्क केंद्राला पाठवा. पहिल्या १० विजेत्यांना खात्रीशीर बक्षिसे !**

संपूर्ण नाव :–

पत्ता :–

मोबाईल क्र. :–


# Recruitment Ad




*Join the Change, Build the Future!*
*Lloyds Infinite Foundation (LIF), the CSR arm of Lloyds Metals & Energy Ltd., is transforming lives in the underdeveloped regions of Gadchiroli. Now, you have the chance to be part of this journey!*
*Exciting opportunities await! Check out our latest vacancies and take the first step toward a purpose-driven career.*

## 1. Paediatrics

- **Qualification:** Min. MBBS, MD/DCH
- **Role:** Medical check-up, treatment & counseling
- **Experience Desired:** 0 to 2 years
- **Salary Range:** 1.60 to 2.50 LPM (Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 2. Obstetrics and Gynaecology

- **Qualification:**Min. MBBS, MS/DGO
- **Role:** Medical check-up, treatment & counseling
- **Experience Desired:** 0 to 2 years
- **Salary Range:** 1.60 to 2.50 LPM (Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 3. Orthopedics

- **Qualification:** Min. MBBS, MD (Orthopedics)
- **Role:** Medical check-up, treatment & counseling
- **Experience Desired:** 0 to 2 years
- **Salary Range:** 2.00 to 2.50 LPM (Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 4. Anaesthesia

- **Qualification:** Min. MBBS, MD/MS (Anesthesia)
- **Role :** Opt. of patient's health, control of patient's level of consciousness
- **Experience Desired:** 0 to 2 years
- **Salary Range:** 2.00 to 2.50 LPM (Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 5. Medical Officer

- **Qualification:** Min. MBBS
- **Role:** Medical check-up, treatment & counseling
- **Experience Desired:** 1 to 3 years
- **Salary Range:** 0.80 to 1.50 LPM(Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 6. Male Nurse

- **Qualification:** Min.BSC/GNM
- **Role:** Patient care
- **Experience Desired:** 2 to 5 years
- **Salary Range:** 2.50 to 4.00 LPA(Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 7. Nurse

- **Qualification:** Min.BSC/GNM
- **Role:** Patient care
- **Experience Desired:** 2 to 5 years
- **Salary Range:** 2.50 to 4.00 LPA(Will vary as per experience)
- **Location:** Hedri, Taluka - Etapalli

## 8. Pre-Primary Teacher

- **Professional Qualification:** Diploma in Preschool Education/Early Childhood Care and Education (ECCE)/Nursery Teacher Training (NTT)/Montessori or equivalent (minimum 2 years, recognized by NCTE)
- **Experience Desired:** Minimum 2 years
- **Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

## 9. Primary Teacher

- **Professional Qualification:** Bachelor of Education (B.Ed.) with a focus on elementary education (recognized by NCTE)
- **Experience Desired:** Minimum 2 years after COVID
- **Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

## 10. Middle School Teacher

- **Professional Qualification:** B.Ed. or equivalent degree in education recognized by NCTE
- **Experience Desired:** Minimum 2 years after COVID
- **Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

## 11. High School Teacher

- **Professional Qualification:** B.Ed. or equivalent degree in education recognized by NCTE
- **Experience Desired:** Minimum 2 years after COVID
- **Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

## 12. Lab Assistant

- **Professional Qualification:** A diploma in laboratory technology/A Certification Program in Laboratory Techniques (CPLT)
- **Experience Desired:** Minimum 5 years
- **Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

## 13. Administrative Roles

- **Qualification:** Diploma/Degree in respective fields
- **Experience Desired:** Minimum 5 years

**Location:** Lloyds Raj Vidya Niketan, Hedri, Gadchiroli

**Interested candidates please share your updated CV on**
**lifinfo@lloyds.in, skv@lloyds.in**